क्रायम विनाअनुदानित तत्वावर
~~विनाअनुदान तत्वावर~~

जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि /२००
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 3 JUL 2002

प्रति,

~~शिक्षणाधिकारी (प्राथमिक),~~
~~जिल्हा परिषद,~~

~~शिक्षण प्रमुख~~/प्रशासन अधिकारी,
~~महानगरपालिका/~~नगरपालिका शिक्षण मंडळ, तळेगाव दाभाडे, जि. पुणे.

विषय :- सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात परवानगी देणेबाबत. (माध्यम - इंग्रजी).

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागाकडील
१. क्रमांक-डीएलएस/ १०००/[५०९/२०००][१]/प्राशि-३,
दिनांक - ६. २. २०००
२. क्रमांक-डीएलएस-१००१/(३८३/२००१)/प्राशि-३,
दिनांक - ३० जून, २००१
या कार्यालयाकडील
३. प्रा/प्राशि/खाप्राशा/नूतनीकरण/पुवि/२००१/११४७,
दिनांक - २४ जुलै, २००१.

उपरोक्त विषयासंबंधीची आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेली शासनाकडील व या कार्यालयाकडून दिलेली संदर्भाधिन पत्रे कृपया अवलोकनी घ्यावीत.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमुद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००० पासून इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २०००-०१, या शैक्षणिक वर्षात देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन जून, २००१ पासून सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष/सुरु असलेल्या/वर्गासह~~ शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर//कायम विनाअनुदानित तत्वावर "अ/ब"/ब-१ परवानगी देण्यात येत आहे//तसेच~~ इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नांव	शाळेचे नांव व ठिकाण	इयत्ता	माध्यम
१.	विश्व कल्याण एज्युकेशन सोसायटी, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे.	तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे.	इ. १ली च्या वर्गास [फक्त एका तुकडीस]	इंग्रजी

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.